# प्राथमिक शिक्षण संचालनालय,

**महाराष्ट्र राज्य, डॉ. ॲनी बेझंट रोड, मध्यवर्ती इमारत, पुणे – १**

दुरध्वनी . (०२०) २६०५ ४३१८
email : depmah2@gmail.com
website : www.depmah.com

क्रमांक : आर.टी.ई./२०२०-२१/टे-५२०/३३४६
दिनांक : २५.११.२०२०

**प्रति,**

**शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई मनपा**
**विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, सर्व.**
**प्रशासन अधिकारी मनपा/नपा/नप सर्व**

**विषय :** शाळा प्रवेशासाठी बालकाचे किमान वय निश्चित करण्याबाबत.

**संदर्भ** : शासन निर्णय क्र. आरटीई-२०१८/प्र.क्र.१८०/एसडी-१, दि. १८.०९.२०२०

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णयाद्वारे पूर्व प्राथमिक व इयत्ता १ ली मधील शाळा प्रवेशाचे किमान वय खालील प्रमाणे निश्चित केलेले आहे.

| अ.क्र. | प्रवेशाचा वर्ग | किमान वय वर्ष | वयाबाबत मानिव दिनांक | अंमलबजावणी वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | नर्सरी<br>(इयत्ता १ ली पूर्वीचा ३ रा वर्ग) | ३ + | ३१ डिसेंबर | २०२१-२०२२ |
| २. | इयत्ता १ ली | ६ + | ३१ डिसेंबर | २०२१-२०२२ |

शासन निर्णय दिनांक २५.०१.२०१७ अन्वये शाळा प्रवेशासाठी ३० सप्टेंबर हा मानिव दिनांक घोषित करण्यात आलेला होता, उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये मानिव दिनांक ३१ डिसेंबर करण्यात आला आहे. त्यामुळे ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर या महिन्यातील जन्म असलेल्या बालकांच्या प्रवेशाबाबत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये अडचणी निर्माण होत आहे. म्हणून मानिव दिनांक बदल्यामुळे या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून फक्त शैक्षणिक २०२१-२२ साठी किमान / कमाल वयोमर्यादा पुढील प्रमाणे असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रवेशाचा वर्ग | वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | नर्सरी<br>(इयत्ता १ ली पुर्वीचा ३ रा वर्ग) | ०१ ऑक्टोंबर २०१७ ते ३१ डिसेंबर २०१८ |
| २. | एल. के. जी.<br>(इयत्ता १ ली पूर्वीचा २ रा वर्ग) | ०१ ऑक्टोंबर २०१६ ते ३१ डिसेंबर २०१७ |
| ३. | इयत्ता १ ली | ०१ ऑक्टोंबर २०१४ ते ३१ डिसेंबर २०१५ |

ऑक्टोंबर २०१७ ते डिसेंबर २०१७ मधील बालकांना नर्सरी किंवा एल.के.जी. या दोन्ही पैकी एका वर्गात पालकांच्या इच्छेनुसार प्रवेश घेता येऊ शकेल. अशा प्रकारे सूचना आपल्या अधिनस्थ सर्व शाळांना देण्यात याव्यात. अशाच प्रकारे इयत्ता १ ली पर्यंतच्या वर्गासाठी वयोमर्यादाबाबत कार्यवाही करावी. आपल्या अधिनस्थ सर्व शाळांना या प्रमाणे कार्यवाही साठी सूचना देण्यात याव्यात.

**(द. गो. जगताप)**
शिक्षण संचालक (प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे — १

**प्रत माहितीस्तव**

१. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
२. मा. आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १